# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रत्नागिरीचे मुख्य बंदर असलेल्या मिरकरवाडा टप्पा क्रमांक दोनच्या मार्गावर आतापर्यंत सुमारे ७५ कोटी खर्च झाले असून आराखडा बाहेर खर्च होऊनही कामाची पूर्तता झाली नसल्यामुळे निर्माण झालेल्या संशयाच्या वातावरणाबाबत

**(१) १३१४९ (१६-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील मिरकरवाडा टप्पा क्रमांक दोनसाठी सात वर्षापूर्वी सुमारे ७४ कोटी ६९ लाख ६७ हजार १०० रुपयांच्या सुधारित प्रशासकीय आराखड्याला मान्यता दिली होती, परंतु त्याआधी वर्षभरापूर्वी सुमारे ७१ कोटी ८० लाखांच्या प्रस्तावाला मान्यता दिली असुन त्यानंतर बंगलोरच्या संस्थेने नवा आराखडा तयार केला असून त्यात निधीची रक्कम ७३ कोटी ५६ लाख ५१ हजार इतकी होती व त्यामध्ये एकूण १८ कामांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू १८ कामांपैकी दोन कामांसाठी ६७ कोटी रुपये खर्च झाले असून त्यामध्ये बंदरातील २ लाख ८० हजार घनमीटर गाळ काढण्यात आला त्यासाठी ६ कोटी ३ लाख २१ हजार रुपये खर्च करुनही बंदर गाळाने भरलेले आहे, तसेच ब्रेक वॉटरची लांबी वाढवणे असे आणखी एक काम हाती घेऊन १५० मीटर ब्रेक वॉटर वॉलचे काम करण्यात आले असून उत्तरेकडे ६७५ मीटर पैकी ५२५ मीटर काम पूर्ण झाले व त्यावर ५१ कोटी ४६ लाख ६९ हजार रुपये खर्च झाले आहेत या व्यतिरिक्त आणखीन १६ कामे करावयाची आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन्ही कामांसाठी झालेल्या ५७ कोटी खर्चाबाबत शंका व्यक्त करण्यात येत असताना मेरीटाईम बोर्ड कडून सुमारे २४ कोटी रुपयांची रक्कम देण्यात आली आहे यामुळे हा खर्च ७८ कोटी पर्यंत पोहोचला असून त्यानंतर आणखीन २९ कोटींचा खर्च केल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असल्याचे म्हटले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (८-३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोरेवाडी-मिणचे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील नाबार्ड विकास योजनेतंर्गत करण्यात आलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(२) १७४६२ (२१-११-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोरेवाडी-मिणचे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील नाबार्ड विकास योजनेंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करुन कंत्राटदार व संबंधित दोषीं अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्यअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांच्याकडे माहे जुन, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधीत ठेकेदार व अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-०३-२०२२) :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे
(२) व (३) अतिवृष्टीमुळे पुलाचे जोडरस्त्याचा खचलेला भाग पावसाळयांनतर संबंधित कंत्राटदाराकडुन दुरुस्त करुन घेण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीकरीता सुस्थितीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील रस्त्यांची कामे संथ गतीने व दर्जाहीन सुरू असल्याबाबत.**

**(३) २७७९२ (१२-०६-२०२१). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यात अनेक वर्षापासून जिंतूर ते परभणी रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असून संबंधित कंत्राटदाराने काम पूर्ण करण्याकरिता रस्त्यात भर टाकण्यासाठी माती मिश्रित मुरुमाचा वापर केला असल्याने सदर रस्त्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे, माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिंतूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर ते अण्णाभाऊ साठे चौक परिसरापर्यंतच्या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हाती घेण्यात आले होते परंतु सदर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून कंत्राटदाराकडून दर्जाहीन डांबरीकरण होत असून डांबरीकरण करताना डांबराचा एकच लेयर टाकत असल्याने रस्ता दिर्घ काळ टिकणार नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास जिंतूर तालुक्यातील पिंप्री ते जिंतूर या नव्याने होत असलेला रस्त्या खोदून बाजूने भरण करण्यासाठी मुरूमा ऐवजी मातीचा वापर होत असल्याने सदर रस्त्याचेही काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी रस्त्याच्या कामास होत असलेल्या विलंबामुळे वारंवार अपघाताच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कठोर कारवाई करुन उपरोक्त रस्त्यांची कामे गुणवत्तेनुसार होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (१२-०१-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) नाही. सदर काम पूर्ण झालेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील भाऊच्या धक्क्यावर बुडालेली "ईपीसी एंजल" या बोटीबाबत

**(४) ३२५०६ (१०-०१-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भाऊच्या धक्क्यावर तौक्ते चक्रिवादळामुळे बुडालेली "ईपीसी एंजल" ही पश्चिम आफ्रिकेच्या लायबेरियातील नोंदणीकृत बोट पाच महिन्यांनंतरही पाण्याबाहेर काढण्यात न आल्याने इंधनगळतीमुळे आसपासचा परिसर प्रदुषित होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बोट कोणाच्या मालकीची आहे, बोट भाऊच्या धक्क्यावर कोणी उभी केली यांचा शोध अद्यापर्यंत लागला नसुन सागरी हद्दीत बोटींना प्रवेश देण्याचे अधिकार मुंबई पोर्ट ट्रस्टकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने उक्त बोट बाहेर काढून सागरी प्रदुषण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (०७-०३-२०२२) :** (१) इपीसी एंजल हे परदेशी जहाज तौकते वादळाच्या वेळी फेरी व्हार्फ येथे बुडाले असून सदर जहाजातून तेल गळतीची कोणतीही तक्रार / माहिती समोर आली नाही.

(२) इपीसी एंजल ची मालकी सिमेक्स शिप मॅनेजमेंट एलएलसी यांची आहे आणि स्थानिक एजंट अमेझ मेरिटाइम सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आहेत. मुंबई पोर्ट ट्रस्टने वैध कागदपत्रांच्या आधारे जहाजाच्या प्रवेशास मान्यता दिली आहे. मुंबई पोर्ट ट्रस्ट हे केंद्र शासनाच्या अखत्यारित येते.

(३) जहाज काढण्यासाठी आवश्यक त्या सर्व प्रक्रिया मुंबई पोर्ट ट्रस्टने केल्या आहेत. मालकास/स्थानिक एजंटला त्वरीत सॅलवेज करण्यास सांगितले गेले, त्यांनी जहाज बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. परंतु तो सफल झाला नाही. सध्या तेथे कोणत्याही प्रदूषणाची नोंद नाही. जहाज बुडीत म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक (महानंद) संघाला आर्थिक मदत देण्याबाबत**

**(५) ३२५८४ (०७-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघाचे (महानंद) नागपूर, लातूर, वैभववाडी आणि वाशी येथील युनिट तोट्यात असल्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांचे पगार व दैंनदिन खर्च भागाविण्यासाठी संघाला (महानंद) ठेवीवर कर्ज काढावे लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या महानंदचा कारभार प्रशासकीय अधिकाऱ्यांमार्फत चालविला जात असल्यामुळे त्यांच्या मनमानीमुळे संघ (महानंद) दिवसेंदिवस तोटयात जात असताना त्यामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती, सेवानिवृत्तींना पुर्वीपेक्षा जादा पगार, संस्थेचे पालक, चालक आणि संचालकांचे झालेले दुर्लक्ष आदि कारणांमुळे महानंद या संस्थेचे नुकसान होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानंदमध्ये अनावश्यक नोकर भरती केली गेल्यामुळे दरमहा ३० ते ४० लाख रुपयांचे नुकसान होत असून शासनाने या संघाचा ६३ कोटी रूपयांचा तोटा निर्लेखित करावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महानंदला आर्थिक सुस्थितीत आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार (०८-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सदर बाबीची /ठरावाची तपासणी सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांचे स्तरावर करण्यात येत आहे.
(४) मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक ६.९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये लॉकडाऊन कालावधीत राबविण्यात आलेल्या अतिरिक्त दूध रूपांतरण योजनेतंर्गत उत्पादित सुमारे ३२४७ मे.टन दूध भुकटी व ४५९ मे.टन बटर विक्रीतून उपलब्ध होणारा अंदाजे रू. ७० कोटी इतका निधी महानंद यांना व्यवसायवृध्दीसाठी भाग भांडवलाच्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माथेरान (जि.रायगड) गिरीस्थानला पर्यटनासाठी पर्यायी रस्ता देण्याबाबत**

**(६) ३२६५१ (११-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरान गिरीस्थान पर्यटनला जाण्यासाठी पर्यायी रस्ता नसल्या कारणामुळे हजारो पर्यटकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-पुण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेली झपाटयाने विकसित झालेली उपनगरे यांच्या मधोमध असलेले निसर्गाने नटलेले थंड हवेचे ठिकाण म्हणुन माथेरानला दरवर्षी ८ ते १० लाख पर्यटक भेट देत असतात हे ही, खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांची माथेरान गिरीस्थानला पर्यायी मार्गची अनेक वर्षापासून मागणी असून पर्यायी रस्ता नसल्यामुळे वैद्यकीय, शैक्षणिक व दळणवळणाची साधने सहज उपलब्ध होत नसल्यामुळे नागरिकांना व पर्यटकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने माथेरान गिरीस्थानला तातडीने पर्यायी रस्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०८-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही .
(२) माथेरान गिरीस्थानला सन २०२१-२०२२ या वर्षात ३,०२,०२१ पर्यटकांनी भेट दिल्याची नोंद आहे
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनोरा आमदार निवासाचे (मुंबई) पुर्नबांधणी कामाबाबत**

**(७) ३२६६९ (११-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील मनोरा आमदार निवासाच्या इमारतीच्या पुर्नविकासाबाबत कंत्राटदार कंपनीकडून अत्यंत धिम्या गतीने कार्यवाही होत असल्यामुळे ते काम कंत्राटदार कंपनीकडून काढून शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याचा शासनाने सन २०२१ मध्ये निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असून प्राप्त झालेल्या निविदा माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये उघडण्यात आल्या असता त्यामध्ये केवळ एकाच निविदाकाराची निविदा प्राप्त झाली असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारत जमीनदोस्त करण्यापूर्वी तेथे राहणाऱ्या मा.सदस्यांना भाडयापोटी दयावी लागत असलेली रक्कम विचारात घेता, मनोरा आमदार निवासाचे पुर्नविकासाचे काम तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी विकासक उत्सुक नसल्याने प्रकल्प प्रलंबित राहण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकल्प तातडीने सुरू करण्याकरीता शासनने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-०३-२०२२) :** (१) होय, मनोरा आमदार निवास पुनर्बांधणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या एन.बी.सी.सी.यांची नियुक्ती रद्द करुन सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेण्यास विधानमंडळाच्या उच्चाधिकार समितीने सन २०२१ मध्ये मंजूरी दिली आहे.
(२) सदर कामासाठी व्दिस्तरीय निविदा पध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येत असून प्रस्तुत कामासाठी राबविण्यात येणा-या निविदा पध्दतीमधील Request For Qualification (RFQ) साठी निविदा सूचना दि.०६.०५.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली. या निविदेसाठी केवळ एकाच निविदाकाराची निविदा प्राप्त झाल्याने दि.२५.०८.२०२१ रोजी फेरनिविदा मागविण्यात आल्या. यावेळी १) मे. टाटा प्रोजेक्टस लि. २) मे.लार्सन अँड टुब्रो लि. व ३) मे.शापूरजी पालनजी अँड कं.प्रा.लि. या तीन कंत्राटदारांनी ऑनलाईन पध्दतीने सर्व कागदपत्रे सादर केली. या तीनही कंत्राटदारांची कागदपत्रे निविदेतील अटी व शर्तीच्या अनुषंगाने निविदा पडताळणी समितीमार्फत छाननी करण्यात आली. सदर छाननी अंती तीनही निविदाकार पात्र ठरले असून सदर निविदापूर्व अर्हता प्रस्तावास शासनाने दि.२४.११.२०२१ रोजी मान्यता दिली आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) सदर कामाचे नकाशे आराखडे मान्यतेस्तव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (MMRDA) सादर करण्यात आले आहेत. मनोरा आमदार निवास हे प्रस्तावित संकुल समुद्र किना-याच्या नजिक असल्याने यासाठी आवश्यक सागरी नियंत्रण क्षेत्र (CRZ) व पर्यावरण विषयक आणि बृन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधीत आवश्यक नाहरकत प्रमाणपत्रे/ परवानग्या प्राप्त करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(४) व (५) हे खरे नाही,
सदर प्रकल्प पूर्ण होण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**पुणे बंगळूर महामार्गावरील कात्रज नवीन बोगदा ते चांदणी चौक,**
**बावधन मार्ग धोकादायक झाल्याबाबत**

**(८) ३२७०६ (११-०१-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे बंगळूर महामार्गावरील कात्रज नवीन बोगदा ते चांदणी चौक, बावधन पर्यंतचा दोन्ही बाजूचा मार्ग धोकादायक झाला असून जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे वारंवार अपघात होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे कात्रज-नऱ्हे (नवले पूल) पुणे या रस्त्याच्या कडेला धोकादायक पध्दतीने उभ्या केल्या जाणाऱ्या बस आणि ट्रक, यामुळे वाढत्या अपघातांच्या अनुषंगाने उपाययोजना होत नसल्याबाबत प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे कार्यालयास जा.क्र.३९९९-२१, दि.१२/०८/२०२१ व जा.क्र.४०९७, दि.१५/०९/२०२१ रोजी लेखी पत्रव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) या हद्दीत महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या मार्गावर जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे दुभाजकात मोठया प्रमाणात वाढलेल्या गवतामुळे विरुध्द दिशेने येणारी वाहने दिसत नसल्याने, वारंवार अपघात होत आहेत हि बाब गंभीर असून संबंधित कामांचा कंत्राटदार याकडे वारंवार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असतांना वारंवार लेखी पत्रव्यवहाराच्या माध्यमातून देखील कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (०९-०३-२०२२) :** (१) पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ (जुना ४) च्या सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(२) दि.१२.०८.२०२१ व दि.१५.०९.२०२१ रोजीची पत्र प्राप्त झाली आहेत. सदर पत्राच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदार व स्वतंत्र अभियंता यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आदेशित करण्यात येऊन अतिरिक्त सुरक्षेच्या दृष्टिने उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच रहदारीचे अधिक प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी आणि महामार्गावरील अनधिकृत पार्किंग टाळण्यासाठी अनधिकृत पार्क केलेल्या वाहनांवर आरटीओ/पोलिस अधिकारी यांचेकडून दंड आकारण्यात येत आहे.

कात्रज नवीन बोगदा ते नवले पूलापर्यंतच्या रस्त्याचे काम आय.आर.सी.च्या मानकांप्रमाणे करण्यात आले आहे. तथापि वाहने चालविताना वाहनचालकांकडून इंधन वाचविण्यासाठी सदर उतारावार Neutral Gear वर वेगाने वाहन चालविल्यामुळे वाहनचालकास वाहनावर नियंत्रण ठेवणे शक्य होत नसल्याने अपघात घडतात, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) व (४) सदर रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीचे काम कंत्राटदाराकडून वेळोवेळी करण्यात येत असून त्यानुसार दुभाजकातील वाढलेले गवत वेळोवेळी काढले जात असून सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे. तसेच रहदारीचे अधिक प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी आणि महामार्गावरील अनधिकृत पार्किंग टाळण्यासाठी अनधिकृत पार्क केलेल्या वाहनांवर आरटीओ/पोलिस अधिकारी यांचेकडून दंड आकारण्यात येत आहे.

सदर महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी सुरक्षा सल्लागाराने सुचविल्यानुसार अतिरिक्त सुरक्षिततेच्या दृष्टिने महामार्गावरील नवले पुलाच्या दोन्ही बाजूने पथदिवे (street light) बसविण्याची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मुंबई पोर्ट ट्रस्ट, जेएनपीटीसह अनेक बंदरांचा सीएसआर फंड गुजरातच्या कच्छ येथील मेरी टाईम हेरीटेज कॉम्लेक्स निर्मितीसाठी वळविल्याबाबत**

**(९) ३२७१९ (०७-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने जेएनपीटी बंदराचे खाजगीकरण केले असताना राज्यातील मुंबई पोर्ट ड्रस्ट, जेएनपीटी बंदरासह देशभरातील ११ बंदरांचा ७५ टक्के सीएसआर फंड गुजरातच्या कच्छ येथील मेरी टाईम हेरीटेज कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी बंदरे विभागाच्या केंद्रीय मंत्र्यांनी आदेश काढून वळविण्यात आल्याचे दिनांक ९ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील मुंबई पोर्ट ट्रस्ट, जेएनपीटी बंदरास एकूण किती रुपये सीएसआर उपलब्ध निधी केंद्रीय मंत्र्यांनी आदेशाद्वारे गुजरातकडे वळविण्यात आहे,
(३) असल्यास, याबाबत राज्य शासनाने केंद्र सरकारकडे तक्रार करुन राज्याचा उपलब्ध सीएसआर निधी राज्यातील बंदरांच्या विकासासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत पत्र व्यवहार करुन मागणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अस्लम शेख (०७-०३-२०२२) :**(१), (२), (३) व (४) मुंबई पोर्ट ट्रस्ट (MBPT) व जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (JNPT) ही बंदरे केंद्र शासनाच्या अखत्यारित असून मिनिस्ट्री ऑफ शिपींग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र दि.०४ मार्च २०२० अन्वये सीएसआर फंडातून २० टक्के (i) नॅशनल मेरिटाईम हेरिटेज कॉम्पेक्स, गुजरात (ii) सैनिक कल्याण बोर्ड, (iii) नॅशनल युथ डेव्हलपमेंट या करीता तरतूद करण्यांत आलेली आहे. मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचेकडून दि.०१.१२.२०२१ च्या पत्रान्वये आणि जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांचेकडून दि.०३.१२.२०२१ च्या पत्रान्वये सीएसआर मधून निधी वितरित केलेला नसल्याचे कळविले आहे.

---

## राज्यातील अनधिकृत मासेमारीला आळा घालण्याबाबत

**(१०) ३२८६० (०७-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मासेमारी व्यावसायात पारंपारीक मच्छिमारांचे हितसंबंध जोपासणे, मत्स्य उत्पादन वाढविणे, पर्ससीन मासेमारी, ट्रॉलिंग मासेमारी, एलईडी लाईट वापरुन केली जाणारी मासेमारी यांचे नियमन करण्यासाठी व अनधिकृत मासेमारीस आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) अद्याप याबाबत निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अस्लम शेख (०८-०३-२०२२) : (**१) होय, हे खरे आहे.
मासेमारी व्यवसायातील विविध गटांचे विशेषत: पारंपारीक मच्छीमारांचे हितसंबंध जपणे व शाश्वत मासेमारी व्यवस्थापनाद्वारे भविष्यकालीन मत्स्यसाठयाच्या जतनासाठी शासन आदेश दि. ०५.०२.२०१६ अन्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन केले आहे. तसेच शासन आदेश ०८.०२.२०१६ अन्वये झाई ते मुरुड सागरी जलधी क्षेत्रात ट्रालिंग मासेमारीवर व २७/०४/२०१८ च्या अधिसुचना अन्वये एलईडी लाईटचा वापर करुन मासेमारी करण्यास प्रतिबंध करण्यांत आलेला आहे. अनधिकृत मासेमारीस आळा घालण्यासाठी विभागामार्फत राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात गस्त घालण्यात येउन अनधिकृत मासेमारी नौकांवर कारवाई करण्यात येते.

(२) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१, यामध्ये सुधारणा करण्यात आली असुन २३ नोव्हेंबर २०२१ रोजी अध्यादेश प्रख्यापित केला होता. सद्यास्थितीत सदर अध्यादेशाचे रुपांतर २५ जानेवारी २०२२ रोजी अधिनियमात झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण तालुक्यातील (जि.रायगड) येथील हनुमान कोळीवाडा येथील घरांबाबत

**(११) ३२९०३ (०७-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यात जेएनपीटी बंदर उभारण्यासाठी ३७ वर्षापूर्वी भूमिपुत्रांच्या घेतलेल्या जमिनींच्या बदल्यात भूमिपुत्रांचे पुनर्वसन करण्यात आलेल्या हनुमान कोळीवाडा येथील २५६ घरांना वाळवीने पोकरले असल्याचे प्रकल्पग्रस्तांनी वारंवार जेएनपीटी प्रशासनाकडे अर्ज, विनंत्या करुनही अद्याप कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमिपुत्रांचा वाढता तीव्र असंतोष व अस्थिरता यामुळे भूमिपुत्रांच्या ग्रामसुधार समितीने दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास भर समुद्रात चॅनेल बंद आंदोलन करण्याचा इशारा जेएनपीटी प्रशासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळवी लागलेल्या घरांच्या दुरुस्तीबाबत जेएनपीटी प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घेण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (०७-०३-२०२२) :** (१) जेएनपीटी बंदर हे केंद्र शासनाच्या अखत्यारित असून सन १९९६ साली ज्या घरांना वाळवी लागली होती त्या घराचेसाठी जिल्हाधिकारी रायगड यांचे मार्फत वाळवी प्रतिबंधक उपाय योजना राबवून जेएनपीटी मार्फत पूर्वी खर्च करण्यांत आलेला होता. घरांचे स्थलांतरासाठी जिल्हाधिकारी रायगड यांचे मार्फत जेएनपीटी ने सर्व खर्च मा.जिल्हाधिकारी यांचे कडे वर्ग केला होता. तसेच दूबार पूनर्वसनासाठी जेएनपीटीने रु. ५ कोटी ६९ लाख जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग केले आहेत. तसेच अंदाजपत्रकात जर वाढ झाली तर ते ही पैसे देण्यास जेएनपीटीने अनुकुलता दर्शविली आहे.
(२) जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी रायगड यांचे दालनात झालेल्या दिनांक १७/११/२०२१ रोजीच्या बैठकीत ठरल्यानुसार हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतलेले आहे.
(३) जेएनपीटी प्रशासनाकडून यापुर्वीच कार्यवाही झालेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातुर जिल्हयात अतिवृष्टीमुळे जिल्हयातील गावा गावांना जोडणाऱ्या रस्त्यांवरील पूल वाहून गेल्याबाबत

**(१२) ३३०२९ (०६-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील माहे सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्हयातील नद्या व नाल्यांना पूर येऊन गावा गावांना जोडणाऱ्या रस्त्यांवरील ५५ पूल वाहून गेल्याची जिल्हा परिषद, लातूर च्या पाहणी अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे रस्त्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून रस्ते वाहतूकीस अयोग्य झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय निदर्शनास आले, त्यानुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त जिल्हयातील अतिवृष्टीमुळे पुरामुळे गावा-गावांना जोडणाऱ्या रस्त्यांवरील वाहून गेलेले पूल व रस्त्यांचे झालेले नूकसान भरुन काढणे, तसेच सदरहू रस्त्यांची व पुलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) राज्यातील विविध भागामध्ये जूलै, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीमध्ये अतिवृष्टी झालेली असून त्यामध्ये लातूर जिल्हयाचा देखील समावेश आहे.

अतिवृष्टीमुळे राज्यातील विविध जिल्ह्यांसह लातूर जिल्ह्यातील ग्रामीण मार्गांचे नुकसान झालेले आहे. राज्यातील अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव वित्त विभाग तसेच मदत व पुनर्वसन विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंडणगड, (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आतले-उन्हवरे नदीवर पुलाची मागणी**

**(१३) ३३२३९ (०६-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंडणगड, (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आतले-उन्हवरे नदीवर पूल बांधण्याची मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांच्या मागणीनुसार उन्हवरे नदीवर पूल बांधण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उन्हवरे नदीवर पूल बांधण्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०३-२०२२) :** १.अशा प्रकारची मागणी शासन स्तरावर प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) व (३) प्रश्नामध्ये नमुद केलेल्या आतले-उन्हवरे नदीवरील पूलाची मागणी ही अस्तित्वातील नसलेल्या सुमारे २.०० कि.मी. लांबीच्या योजनाबाहृय रस्त्यावर आहे. सदर रस्ता योजनाबाहृय स्वरुपाचा असल्याने योजनेत्तर कार्यक्रमातून सदर रस्त्याचे व पुलाचे काम प्रस्तावित करणे सद्य:स्थितीमध्ये शक्य नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात महानिर्मिती कंपनीने कोणतेही कारण न देता हजारो कामगारांचे वेतन थकवले असल्याबाबत**

**(१४) ३३२९३ (१२-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महानिर्मिती कंपनीने कोणतेही कारण न देता हजारो कामगारांचे वेतन थकवले असल्याने चिपळूण पोफळी येथील विदयुत क्षेत्र कामगार युनियनने आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाच्या दुस-या लाटेने कहर केला असताना महानिर्मितीने इतिहासातील वीजनिर्मितीचा उच्चांक गाठून महाराष्ट्राची सेवा सुरु ठेवली असताना देखील कंपनीतील कर्मचारी यांना वेळेवर वेतन देण्यात येत नसल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (०४-०३-२०२२) :** (१), (२) व (३) महानिर्मिती कंपनीमधील कर्मचाऱ्यांचे वेतन सर्वसाधारणपणे महिन्याच्या शेवटच्या कार्यालयीन दिवशी करण्यात येते. परंतु मार्च, २०२१ या महिन्याचे वेतन दि.०१.०४.२०२१ रोजी आर्थिक वर्ष हिशोब पूर्तीनिमित्त बँका बंद असल्याने तसेच दि. ०२, ०३ व ०४ एप्रिल, २०२१ रोजी सुट्टी असल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन दि.०५ एप्रिल, २०२१ रोजी अदा करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड, दापोली, मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खारभूमी विकास योजनांचे मापदंड वाढवून मिळण्याबाबत**

**(१५) ३३३५१ (१२-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **खार जमिनी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड, दापोली, मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यात खारभूमी विकास योजनांचे मापदंड वाढवून मिळावे याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. खारभूमी विकास मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन खारभूमी विकास योजनांचे मापदंड वाढवून देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०४-०३-२०२२) :** (१) होय.
मा. आमदार श्री. योगेशदादा कदम यांचे खेड, दापोली, मंडणगड तालुक्यातील खारभूमी विकास योजनांचे मापदंड सुधारीत करण्याबाबत (जि.रत्नागिरी) दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजी पत्र प्राप्त झाले आहे.
(२) खारभूमी विकास योजनांचा सुधारीत मापदंडाबाबतचा जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्रमांक खाभूयो २०१९/ (३०/२०१९)/खारभूमी, दिनांक ०४.०३.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यस्तरावरील आणि जिल्हा स्तरावरील कोरोना रुग्णा व कोरोना मृत्यूंची च्या संख्येत तफावत असल्याबाबत**

**(१६) ३३८६५ (१०-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य स्तरावरील आणि जिल्हा स्तरावरील कोरोना रुग्णांच्या संख्येत सुमारे ८० हजार १५८ रुग्ण इतकी " अतिरिक्त " आणि कोरोना मृत्यूंची संख्या सुमारे ११ हजार ५०० रुग्ण इतकी " कमी " असल्याचे दिनांक १० जुन,२०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची कारणे काय आहेत

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (०७-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोविड माहिती व्यवस्थापनासाठी जी दोन पोर्टल वापरण्यात येतात त्यातील तांत्रिक अडचणीमुळे सदर माहिती प्रलंबित असल्याने कोवीड-१९ मुळे मृत्यूची संख्या आणि कोवीड-१९ रुग्णांच्या संख्येत काही तफावत राहीली होती.

(२) कोवीड-१९ मुळे झालेल्या मृत्यूंच्या आणि कोवीड-१९ बाधित रुग्णांच्या संख्येत तफावतीबाबतची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे-

१. प्रत्येक हॉस्पिटलने त्यांच्याकडील रुग्णांची माहिती वेळेवर भरावी. अद्ययावत करावी यासाठी प्रत्येक रुग्णालयाला फॅसिलिटी अॅप ही ऑनलाईन सेवा पुरवण्यात आलेली आहे. तथापि अनेक रुग्णालय, विशेषत: खाजगी रुग्णालय या फॅसिलिटी अॅपवर त्यांच्याकडील रुग्णांची माहिती अद्ययावत करत नाहीत. त्यामुळे किती रुग्ण बरे होऊन घरी गेले अथवा किती जणांचा मृत्यू झाला याबाबत रियल टाइम डेटा मिळण्यामध्ये अडचणी येतात.

२. हॉस्पिटल स्तरावरुन विलंब झाल्यास जिल्हास्तरावरुन ही माहिती संकलित करुन ती कोविड पोर्टलवर अपलोड केली जाते. परंतु या प्रक्रियेमध्ये अनेकदा बराच वेळ लागतो यामुळे काही मृत्यूंची माहिती ब-याच कालावधी करता प्रलंबित राहते.

३.आयसीएमआर पोर्टलवर प्रयोगशाळा आपली माहिती भरतात. परंतु अनेकदा प्रयोगशाळांकडील तपासलेल्या नमून्यांची सर्व माहिती वेळेवर भरली जात नाही. तपासलेल्या नमून्याबाबत माहिती प्रलंबित राहिली तर ते पॉझिटिव्ह रुग्ण पोर्टलवर दिसत नाही. त्यामुळे अशा रुग्णांच्या डिस्चार्ज किंवा मृत्यू विषयक माहिती देखील वेळेत भरण्यामध्ये अडचणी येतात.

४. दोन पोर्टलवरील माहिती एकत्रित होण्यासाठी लागणारा वेळ (Synchronization) आणि इतर तांत्रिक कारणामुळे देखील माहितीमध्ये तफावत आढळते.

५. राज्यामध्ये एप्रिल व मे महिन्यामध्ये कोवीड-१९ बाधित रुग्णांची संख्या खूप जास्त होती. या कालावधीत जिल्ह्यांची सर्व यंत्रणा रुग्ण व्यवस्थापन, खाटांचे व्यवस्थापन,

ऑक्सिजन व औषध पुरवठा या बाबीमध्ये व्यस्त असल्यामुळे या काळातील नोंदी या प्रलंबित राहिलेल्या असून जिल्हा व रुग्णालय स्तरावरुन त्याचे अद्ययावतीकरण सध्या करण्यात येत आहे.
(३) साधारणपणे दर पंधरा दिवसांनी दोन्ही पोर्टलवरील माहिती आणि राज्य अहवाल यातील माहितीची तुलना केली जाते आणि तांत्रिक कारणाने झालेले फरक दूर केले जातात.
(४) सर्व जिल्ह्यांच्या आकडेवारीचा दैनंदिन आढावा घेतला जातो आणि आकडेवारीतील फरक दूर करण्याबाबत जिल्ह्यांना वेळोवेळी सूचित करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगाव शेरी (जिल्हा, पुणे) चऱ्होली धानोरी जोडणारा गाव रस्ता वनविभागाने अडवणूक केल्यासंदर्भात**

**(१७) ३३८८९ (११-०१-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगाव शेरी (जि.पुणे) येथील चऱ्होली-धानोरी जोडणारा गाव रस्ता वनविभागाने अनधिकृतरीत्या बंद केला आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता बंद केल्याने नागरिकांना २५ ते ३० किलोमीटर वेढा घालून जावे लागत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता हा वनविभागाच्या मालकीचा आहे काय,
(४) नसल्यास, सदर रस्त्यासंदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे?

**श्री. उद्धव ठाकरे (२१-०१-२०२२) :**(१) हे खरे नाही, मौजे धानोरी राखीव वन सर्व्हे नं.६९ चे संदर्भात भारतीय सर्व्हेक्षण विभाग यांचेकडील टोपोशिट क्र.४७ F १४ मध्ये सदर भाग हा Pack Track (जनावरांसाठी वापर) लांबी २५० मी. असा दर्शविला आहे. त्यामुळे सदर रस्ता हा वाहन रहदारीचा होत नाही. तथापि, सदर ठिकाणी जड वाहनांची अनाधिकृतपणे वाहतुक सुरु असल्यामुळे तो बंद करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही, वडगांव शेरी मतदार संघातील चऱ्होली-धानोरी गावांना पोरवाल-अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ मार्गे सदरील गावांना जोडणारा ६.३ कि.मी. लांबीचा डांबरी रस्ता अस्तित्वात असलेबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी कळविले आहे.
(३) मौजे धानोरी राखीव वन सर्व्हे नं.६९ एकूण क्षेत्र ७१.६६ हे भारतीय वन अधिनियम १८७८ चे कलम ३४ अंतर्गत निर्गमित अधिसूचना क्र.२४ फ, दि.०१.०३.१८७९ नुसार राखीव वन म्हणून घोषित आहे. सदर क्षेत्रास भारतीय वन अधिनियम १९२७ व वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या सर्व तरतुदी लागू आहेत. तसेच सदर रस्त्याचा भाग हा भारतीय सर्व्हेक्षण विभाग यांचेकडील टोपोशिट क्र.४७ F १४ मध्ये Pack Track (जनांवरासाठी वापर) असा दर्शविला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी चऱ्हाली धानोरी रस्त्याची आवश्यकता असल्यास संबंधित प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत विहीत नमुन्यातील प्रस्ताव तयार करुन त्यास केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेतल्यास सदर ठिकाणचा रस्ता वापरता येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू तालुक्यातील धानिवरी ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरीपाडा येथील सुसरी नदिवरील पूल नादुरुस्त असल्याबाबत**

**(१८) ३४११४ (०६-०१-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानिवरी ग्रामपंचायत (ता.डहाणू, जि.पालघर) हद्दीतील दहीगाव, डोंगरीपाडा येथील सुसदी नदिवरील पूल पुराच्या पाण्याने वाहून गेल्याने गेल्या अनेक वर्षापासून तेथील नागरीकांना नदीतून ये-जा करावी लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले, तदनंतर कोणती कार्यवाही करण्यात आली,

(३) असल्यास, सदरहू पुलाची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०८-०३-२०२२) : (**१) व (२) अंशत: खरे आहे.

डहाणू तालुक्यातील पारसपाडा इजिमा १८० ला जोडणारा रस्ता हा ग्रामीण मार्ग ३७२ असून त्याच्या सा.क्र. १/५०० वर मोरी आहे. भौगोलिक दृष्टया हा भाग अतिपर्जन्याचा असून अतिवृष्टीमुळे मोरीवरील कॉंक्रीटचा पृष्ठभाग व डिपच्या एका बाजूकडील ॲप्रोच रस्त्याचा मातीभराव वाहून गेला होता.तथापि, ग्रामपंचायत धानिवरी यांनी सदर मोरीची तात्पुरती दुरुस्ती करुन वाहतूक सुरु केली आहे.

(३) सदर पुलाची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्यासाठी रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनांमध्ये प्रस्ताव सादर करुन त्यासाठी प्राथम्याने निधी मिळविण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भाऊच्या धक्कावरुन लहान बोटींद्वारे अवैध वाहतुक केली जात असल्याबाबत.**

**(१९) ३४२३३ (०७-०१-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भाऊच्या धक्कावरुन लहान बोटींद्वारे अवैध वाहतुक केली जात असताना बंदर नियंत्रकांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किना-यांपासून लांब अंतरावर नांगर टाकलेल्या बोटीतील कर्मचा-यांना विशेष सेवा देण्यासाठी सदर बोटींचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाऊच्या धक्कावरुन लहान बोटींच्या दररोज ७५ ते ८० फे-या होत असून सदर बोटींमध्ये किती तसेच कोणत्या देशाचे नागरिक प्रवास करित असतात याची व त्यांनी आणलेल्या सामानाची तपासणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बोटींमधून मद्य, चरस, गांजा आणि अन्य अंमली पदार्थांचा सर्रासपणे वाहतूक होत असून तपास अधिकारी या प्रकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बोटींमधुन अवैध वाहतुक करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (०७-०३-२०२२) :**(१) नाही.
(२), (३) व (४) भाऊचा धक्का हा परिसर मुंबई बंदर विश्वस्त यांचे अखत्यारित येतो. पॅसेंजर टर्मिनलवरील प्रवाशांची सर्व हालचाल आणि त्यांचे सामान हे पूर्णपणे तेथे तैनात असलेली पोलीस यंत्रणेच्या निगराणीखाली आहे. पॅसेंजर टर्मिनलवर बसवण्यात आलेल्या स्कॅनिंग मशीनचा वापर प्रवाशांच्या सामानाची तपासणी आणि स्कॅनिंगसाठी केला जातो. परिसरात पोलिस व्हॅनद्वारे नियमित पेट्रोलिंग केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केळवणे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील खारबंदीस्ती तुटल्यामुळे समुद्राचे पाणी जमिनीत शिरल्यामुळे हजारो एकर जमिन नापिक झाली असल्याबाबत

**(२०) ३४३९५ (१२-०१-२०२२). श्री.महेश बालदी (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **खार जमिनी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केळवणे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील खारबंदीस्ती तुटल्यामुळे समुद्राचे पाणी शेतात शिरल्याने हजारो एकर जमिन नापिक झाली असल्याचे माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागातील जमिनीवर मोठया प्रमाणात भातशेतीचे उत्पादन होत असल्याने शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमिनीतील शेतपिकांचे नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०८-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.
केळवणे (ता. पनवेल, जि. रायगड) ही खाजगी खारभूमी योजना असून या योजनेची देखभाल व दुरूस्ती शासनामार्फत करण्यात येत नसून या योजनेचे देखभाल व

दुरुस्तीचे काम संबधित लाभधारक स्वखर्चाने करत आहेत. सदर योजना सततची भरती ओहोटी व अतिवृष्टी, चक्रीवादळ यामुळे कमकुवत झाली होती. तसेच या योजनेला मोठ्या खांडी पडल्या होत्या. त्यामुळे केळवणे गावाला धोका निर्माण झाला होता. तातडीची उपाययोजना म्हणून शासनाच्या जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेमार्फत या योजनेचे तात्पुरत्या दुरुस्तीचे काम सन २०१८ मध्ये पूर्ण करण्यांत आले आहे. तसेच सन २०२०-२१ मध्ये लोकप्रतिनिधी (उरण) यांचे मार्फत जिल्हा नियोजन विकास समिती मधून कोनी केळवणे या खाजगी खारभूमी योजनेच्या सा.क्र.० मी. ते सा.क्र.१२० मी.मधील बांधाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत योजना सुस्थितीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्नाटक राज्यात सन २०१६-२०१७ साली सोडलेले पाणी महाराष्ट्र राज्यास परत मिळण्याबाबत**

**(२१) ३४५१० (०५-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक राज्यात सन २०१६ व २०१७ मध्ये सोडलेल्या एकूण ६.८६५ अब्ज घन फुट पाण्यापैकी आत पर्यंत केवळ ०.०७८ अब्ज घन फुट पाणी सोला जिल्हयासाठी महाराष्ट्र राज्यास परत दिले आहे व ६.७८७ अब्ज घन फुट पाणी अद्याप कर्नाटक राज्याकडून परत मिळणे शिल्लक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाने शासनपत्र क्र.संकीर्ण -२०१९/प्र.क्र.१३६/१९/जसं दि ११/०८/२०२१ अन्वये जत तालुक्यातील ६५ वंचित गावांना ६ TMC पाणी देण्याचा निर्णय घेतला असून म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्र.३ मधून ३ टप्प्यादवारे ६ TMC पाणी उचळून जत तालुक्यातील वंचित गावांमधील २४ हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होईल परंतू सदर योजना कार्यान्वियत होई पर्यंत कर्नाटक राज्याकडे शिल्लक राहिलेले ६.७८७ अब्ज घन फुट पाणी जत तालुक्यातील वंचित गावांना तुबचीबबलेश्वर योजनेतून तात्पुरत्या स्वरुपात देणे संयुक्तीक वाटते असा अहवाल अधिक्षक / उपअधिक्षक अभियंता सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमाराच्या जा.क्र.सांपामं/प्रशा क्र.१ ५२३२/२०२१ पत्रान्वये मुख्य अभियंता (ज.सं) जलसंपदा विभाग पुणे यांना सादर केला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ६.७८७ अब्ज घन फुट पाणी अद्याप कर्नाटक राज्याकडून परत मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०७-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर बाब ही केंद्र शासनाच्या निगडीत नसल्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आलेला नाही. तसेच दि.११/०६/२०२१ रोजी संपन्न महाराष्ट्र राज्य व कर्नाटक राज्य संयुक्त समितीच्या बैठकीत तुबची बबलेश्वर योजनेच्या तांत्रिक अडचणी, संकल्पन तरतुदी व पाण्याच्या अनुपलब्धतेमुळे सदरचे पाणी देता येत नसल्याचे कर्नाटक राज्याकडून सांगण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**(ता. नवापूर जि. नंदुरबार) भुरीवेल व पिंप्राणे लघुपाटबंधारे योजनेच्या प्रस्तावित व्दितीय प्रशासकीय मान्यतेबाबत**

**(२२) ३४५५४ (०५-०१-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (ता. नवापूर, जि. नंदुरबार) तालुक्यामधील भुरीवेल व पिंप्राणे लघुपाटबंधारे योजनेच्या प्रस्तावित व्दितीय प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोनही योजनेबाबतच्या प्रस्तावान्वये सदरहू किती रक्कमेची मागणी करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त दोनही योजनेबाबत व्दितीय सुधारीत प्रशासकीय प्रस्तावास शासनाकडून मान्यता देण्यास किती कालावधी लागेल, सदरहू प्रकल्प पूर्ण झाल्यास किती हेक्टर जमीन ओलिताखाली येईल,

(४) असल्यास, भुरीवेल व पिंप्राणे लघु पाटबंधारे (ता.नवापूर, जि.नंदुरबार) या योजनेच्या व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्तावास अंतिम मंजूरी देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील भुरीवेल ल.पा. योजनेचा द्‌वितीय प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असून रु. ३८.४१ कोटी किंमतीचा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे कार्यालयाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांच्या पुर्ततेत क्षेत्रीय स्तरावर आहे. तथापी पिंप्राणे ल.पा. तलावाची सुप्रमाची सद्य:स्थितीत आवश्यकता नाही.

(२) (१) भुरीवेल ल.पा.योजना - भुरीवेल लघु पाटबंधारे योजना प्रस्तावित व्दितीय प्रशासकीय मान्यतेची किंमत रू.३८.४१ कोटी आहे. (दरसुची २०१८-१९)

(२) पिंप्राणे ल.पा.योजना - सद्यस्थितीत सुप्रमा आवश्यक नाही.

(३) व (४) (१) भुरीवेल ल.पा.योजना :- व्दितीय सुप्रमा अहवालास मान्यता देण्याबाबत राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांची बैठक क्र.१६२ दि.२४/०७/२०२१ अन्वये घेण्यात आलेली आहे. या बैठकीत उपस्थित शेरेपुर्तता क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. सदर सुप्रमाचा छाननी

अहवाल अंतीम झालेनंतर शासनास मान्यतेसाठी सादर झाल्यानंतर मान्यतेबाबत कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येईल.

(२) पिंप्राणे ल.पा.योजना:- सद्य:स्थितीत सदर योजनेस व्दितीय सुप्रमा आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे व नंदुरबार जिल्हयातील उपसा सिंचन योजनांबाबत.

**(२३) ३४६०६ (०५-०१-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे व नंदुरबार जिल्हयातील २२ उपसा सिंचन योजनांची विद्युत जोडणीसह तांत्रिक अडचणींची दुरुस्ती करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपसा सिंचन योजनांची विद्युत जोडणीसह तांत्रिक अडचणींची दुरुस्ती करण्यासाठी अंदाजपत्रकांनुसार किती रकमेची आवश्यकता आहे,

(३) असल्यास, शासनस्तरावर सुधारित अंदाजपत्रके मंजूर करण्यात आली आहेत काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शाासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (०७-०३-२०२२) :** (१) होय.

(२) २२ उपसा सिंचन योजनांच्या दुरुस्तीसाठी रु.११५.०३ कोटी रकमेची आवश्यकता आहे.

(३) व (४) होय,

शासन निर्णय उसिंयो/२०१९/(३६७/१९) सिंव्य (म) दि.२१.०१.२०२२ नुसार रू.११५.०३ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्या अन्वये क्षेत्रिय स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### केंद्राच्या कृषी पायाभुत निधी योजने बाबत

**(२४) ३४६०८ (१२-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात "कृषी पायाभुत निधी" अंतर्गत केंद्रीय क्षेत्र योजनेत वित्तीय सुधारणेचा प्रस्ताव माहे जुलै २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील शेती विषयक संस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्या, राज्य सहकारी महासंघ, शेतकरी उत्पादक संघ, स्वंय सहाय्यता गट इत्यादी घटकांना या योजनेसाठी पात्र ठरवुन पुर्वी असलेला ४ वर्षाचा वित्तीय सुविधेचा कालावधी सहा वर्षापर्यंत म्हणेजच योजनेचा एकुण कालावधी २०३२-३३ पर्यंत वाढविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त केंद्र शासनाच्या प्रस्तावानुसार राज्यात कोणत्या जिल्हयात सदर निधीचा विनियोग करण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०९-०३-२०२२) :** (१) होय.
(२) होय.
(३) कृषि पायाभुत निधी योजनेंतर्गत राज्यातील सर्व जिल्हयात प्रकल्प राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सागरी किनारा मार्ग प्रकल्पामुळे मच्छिमारांच्या निर्माण झालेल्या समस्या सोडविण्याबाबत

**(२५) ३४७११ (१७-०१-२०२२). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य रस्ते विकास महामंडळाने ना हरकत प्रमाणपत्र देताना ठरवून दिलेल्या अटींचे उल्लंघन होत असल्यामुळे सागरी किनारा मार्ग प्रकल्पाचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे, असे निवेदन अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने रस्ते विकास महामंडळाला दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छीमारांना त्यांचा व्यवसाय करण्यास अडथळा निर्माण झाल्यास आणि मच्छीमारांनी आक्षेप घेतल्यास दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रातील अटीचा भंग केल्याचे गृहीत धरले जाईल, असे ना-हरकत प्रमाणपत्रात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मासेमारी करण्याकरिता जाळी मारण्याच्या ठिकाणी सागरी किनारा मार्ग प्राधिकरणाने मच्छीमारांना कोणतीही पूर्वसूचना न देता मच्छिमारांच्या येण्या-जाण्याच्या मार्गावर बार्जेस उभे केल्याने मासेमारीत पर्यायाने मच्छीमारांच्या उपजीविकेमध्ये अडसर निर्माण झाल्यामुळे मच्छीमारांनी सदर निवेदनाद्वारे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्राधिकरणाने नौकांच्या येण्या-जाण्याचा मार्ग लक्षात घेऊन १४० मिटर क्षेत्रफळातील दोन खांबांमध्ये ठेवलेले ६० मीटरचे अंतर २०० मीटर करावे, अशीही या मच्छीमारांची मागणी आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, मच्छीमारांच्या उपजीविकेवर येणारी गदा लक्षात घेता त्यांच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२२) :** (१) ते (५) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचा सागरी किनारी रस्ता सागरी सेतूस जोडण्याकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत दिनांक ३० मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये ना-हरकत दाखला देण्यात आला आहे. सदर दाखल्यात “There shall not be any hindrance to fishing activities in this connecting area, if objected” हि अट घालण्यात आली असून, त्याचे पालन करणे बृहन्मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

---

**स्वच्छ भारत मिशन अभियानातंर्गत (जि. परभणी) येथे उभारण्यात आलेल्या शौचालयाच्या कामात झालेल्या गैरव्यवहार**

**(२६) ३४७७५ (०६-०१-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात स्वच्छ भारत मिशन अभियानातंर्गत उभारण्यात आलेल्या शौचालयांच्या कामात गैरव्यवहार झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या विरुध्द सामान्य प्रशासन व ग्रामविकास विभागाकडून सुरु असलेली विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थितीची पाहणी करुन पाहणीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि सदर प्रकरणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशीमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.भाप्रसे-१०१८/ वि.चौ/प्र.क्र.४२/ दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ च्या आदेशान्वये विभागीय चौकशी बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

---

**बुट्टेनाथ (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील साठवण तलावासाठी मंजुरी मिळण्याबाबत**

**(२७) ३४८५७ (०५-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुट्टेनाथ (ता.अंबाजोगाई,जि.बीड) साठवण तलाव मंजुर करावा अशी मागणी तालुक्यातील शेतक-यांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुट्टेनाथ साठवण तलाव मंजुरीसाठी या परिसरातील शेतकरी शासन आणि प्रशासन स्तरावर ब-याच दिवसांपासून मागणी करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागापूर साठवण तलावामध्ये मोठया प्रमाणात गाळ वाढलेला असल्यामुळे पाणी साठवन क्षमता कमी झाली असल्यामुळे बुट्टेनाथ साठवण तलावासाठी पाणी उपलब्ध प्रमाणपत्र देण्यात यावे अशी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी, गावक-यांची आणि शेतक-यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बुट्टेनाथ साठवण तलाव मंजुरीसाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे,

(५) नसल्यास, बुट्टेनाथ साठवण तलाव मंजुरीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. जयंत पाटील (०४-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

बुट्टेनाथ साठवण तलाव (ता.अंबाजोगाई जि.बीड) मंजुर करावा अशी मागणी तालुक्यातील शेतक-यांकडून अद्याप प्राप्त झाली नाही. तथापि स्थानिक लोकप्रतिनिधीकडून अशी मागणी करण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे

सदर प्रकरणी शेतकऱ्याची मागणी प्राप्त झालेली नसून लोकप्रतिनिधींची मागणी आहे.

(३) हे खरे आहे.

सुदुर संवेदन तंत्राने वान प्रकल्पाच्या गाळाचे मेरी नाशिक मार्फत जुन २०२१ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणा अंती गाळामुळे उपयुक्त पाणी साठयामध्ये १.३११ दलघमी घट झाल्याचे दिसून येते. व बुट्टेनाथ साठवण तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी विनंती केली आहे.

(४) बुट्टेनाथ साठवण तलाव हा अंबाजोगाई शहराजवळ वाण नदीवर वाण मध्यम प्रकल्पाच्या वरील बाजुस प्रस्तावित आहे. सध्या या उपखो-यात नविन प्रकल्पास पाणी उपलब्ध होत नसल्याने व बुट्टेनाथ साठवण तलावाचा परिणाम अस्तित्वातील वाण प्रकल्पावर होत असल्यामुळे बुट्टेनाथ साठवण तलावासाठी पाणी उपलब्ध होत नसल्याचे दिसुन येते.

(५) प्रत्यक्ष पाणी उपलब्धता होत नसल्याने सद्यस्थितीत पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**उल्हासनगर ३ येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ३५०१९ (११-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर ३ येथे तालिका स्तरावर मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यास मान्यता दिली असून देखील गेल्या दोन ते तीन वर्षांपासून इमारतीचे बांधकाम बंद असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे का,

(२) असल्यास, सदर इमारत चे बांधकाम निधी अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी उपलब्ध व्हावा यासाठी संबंधित विभागाने मा सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०२० रोजी मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी व तसेच निधी उपलब्ध होण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने कोणती कार्यवाही करण्यांत आली आहे व करण्यांत येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०२२) :** (१) व (२) अंशत:खरे आहे.

उल्हासनगर कॅम्प-३ व उल्हासनगर कॅम्प-५ येथे प्रशासकीय इमारत बांधकामास दि.२५.०६.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.११२८.९७ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यतेची रक्कम सन २०११-१२ च्या दरसुचीवर आधारीत

होती. तद्नंतर सदर कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सन २०१५-१६ च्या जिल्हा दरसुची आधारे तात्रिक मान्यता प्राप्त देण्यात आली. सदर तांत्रिक मान्यतेच्या आधारे कामे सुरु करण्यात आली. दरसुचीतील बदल व प्रत्यक्ष झालेले काम विचारात घेऊन मूळ प्रशासकीय मान्यता रकमेत वाढ होत असून सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत उल्हासनगर कॅम्प-५ येथील काम पुर्ण झाले असून उल्हासनगर कॅम्प-३ येथील बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

(३) होय, इमारतीचे बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२० रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

(४) सदर इमारतीचे बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.सुधारीत प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात शासकीय कंत्राटदार यांनी केलेल्या निकृष्ट कामाबाबत**

**(२९) ३५०३५ (१७-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील शासकीय कंत्राटदार आर.के. संचेती यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा व खामगाव तसेच पंतप्रधान ग्राम सडक योजना कार्यालय बुलढाणा अंतर्गत २०१४ ते २० मध्ये केलेली कामे निकृष्ट दर्जाची असून सदर कामे कामांमध्ये अपहार होने तसेच आर के संचेती कंत्राटदार यांनी केलेल्या कामासाठी गौण खनिज पावती व डांबर खरेदी यामध्ये सुद्धा प्रचंड प्रमाणात अनियमितता झाली असल्यामुळे सदर बाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक २१ जानेवारी, २०१९ रोजी व त्या दरम्यान माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना चौकशी करणे बाबत विनंती केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या चौकशी चे स्वरूप काय असल्यास शासनाला सदर प्रकरणांमध्ये दोषी आढळलेल्या अधिकारी कर्मचारी तसेच शासकीय कंत्राटदार आर. के. संचेती यांच्यावर केलेल्या कारवाई चे स्वरूप काय,

(३) असल्यास, शासकीय कंत्राटदार आर.के. संचेती यांच्या कंत्राट कंपनीला काळ्या यादीत टाकून त्यांचे परवाना रद्द करण्यात येईल काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (०४-०३-२०२२) :**(१) होय, दि.२१.१२.२०२० चे निवेदन प्राप्त आहे.

(२), (३) व (४) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, अमरावती यांचे मार्फत चौकशी आदेशित करण्यात आली आहे. चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

**निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील गावांना कडवा कालव्यातून पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३०) ३५०४३ (०६-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील जलसंपदा विभागाच्या अंतर्गत असलेल्या कडवा कालवा हा सिन्नर व निफाड तालुक्याच्या सीमेवरून गेलेला कालवा असून या कालव्याच्या पूर्व बाजूला असलेल्या तळवाडे, पिंपळगाव निपाणी, महाजानपूर, भेंडाळी, श्रीरामपूर, औरंगपुर या ६ गावांसाठी कडवा कालव्यातून पोटचारी काढून शेतकर्यांना सिंचनासाठी तसेच पिण्यासाठी पाणी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा मंत्री जलसंपदा यांना यांनी दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील कडवा कालव्यातून शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाकडून कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (०७-०३-२०२२) :** (१) होय

दिनांक ०४/०६/२०२१ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री जलसंपदा यांना तळवाडे, पिंपळगांव निपाणी, महाजानपुर, भेंडाळी, श्रीरामपुर, औरंगपुर ता.निफाड, जि. नाशिक या ६ गावाना कडवा कालव्याची पोटचारी होणेबाबतचे निवेदन दिलेले आहे.

(२) तळवाडे, पिंपळगांव निपाणी, महाजानपुर, भेंडाळी, श्रीरामपुर, औरंगपुर ता.निफाड, जि.नाशिक हि ६ गावे कडवा कालव्याचे निरीक्षण पथाच्या वरील बाजुस आहेत. त्यामुळे सदर गावांना चारीने पाणी देणे तांत्रिकदृष्टया शक्य होत नाही, असे सर्वेक्षणाच्या अंती निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.पो. तारळ, (ता. राजापुर, जि.रत्नागिरी) येथील उगवत लावगणवाडी येथे जाण्यासाठी रस्ता तयार करण्याबाबत**

**(३१) ३५०९४ (०६-०१-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. तारळ (ता. राजापुर, जि.रत्नागिरी) येथील उगवत लावगणवाडी येथे जाण्यासाठी वहाळ आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी पायवाटेमध्ये वहाळ येत असून पावसाळयामध्ये येथून ये-जा करता येत नसल्याचे निदर्शनास आहले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पूल बांधण्यात यावा अशी मागणी गेली अनेक वर्षांपासून ग्रामस्थ करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी रस्ता तयार करणे व वहाळकर पुल बांधणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०३-२०२२) :** (१), (२) व (३) हे, खरे आहे.

(४) तारळ मावळत लावगणवाडी ते उगवत लावगणवाडी जोडरस्ता हा योजनाबाह्य रस्ता आहे. सदर रस्ता राज्यमार्ग क्र.१७० ते चौके लावगणवाडी तारळ बौद्धवाडी रस्ता ह्या ग्रामीण मार्ग क्र.४५च्या सा.क्र.२/३०० पासून सुरु होतो.

सदर रस्त्याच्या सा.क्र. ०/४०० मध्ये वहाळ आहे. सदर रस्ता योजनाबाह्य स्वरुपाचा असल्याने रस्ते व पुल दुरुस्तीच्या योजनांमधून रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे सदर रस्त्याचा रस्ते विकास आराखडयामध्ये समावेश करण्यासाठी प्रचलित निकषाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील उर्वरित विमा भरलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(३२) ३५१४४ (०७-०१-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर)** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील शेतकऱ्यांचे मागील ऑक्टोबर-नोव्हेंबर या दरम्यान अवकाळी पावसामुळे भात शेतीचे प्रचंड नुकसान झाले असुन पंतप्रधान पीक विमा योजेनेंतर्गत सुमारे ३४ हजार ८८९ शेतकऱ्यांनी विमा संरक्षित रक्कमेची भरणा केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ३४ हजार ८८९ शेतकऱ्यांपैकी फक्त एकूण १ हजार ६७९ शेतकऱ्यांना पंतप्रधान पीक विमा योजनेचा लाभ मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हयातील उर्वरित विमा भरलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यात धान (भात) पिकाचे नोव्हेंबर २०२१ या महिन्यात अवकाळी पावसामुळे नुकसानीचे ८०६५.३५ हे. क्षेत्र बाधीत होते. प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२१ मध्ये पालघर जिल्ह्यात २५०२६ अर्जदार शेतकऱ्यांनी सहभाग घेतला असून १२६७८.७१ हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यात भात या पिकासाठी २३७९८ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला असून ११९८१.१८ हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे.

योजनेअंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान या बाबी अंतर्गत १५६७२ शेतकऱ्यांचे पुर्वसूंचना प्राप्त झाल्या. त्यापैकी एकूण ६० शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम

रु. ६१.०० लाख व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत २३७१ शेतकऱ्यांचे पुर्वसूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी एकूण १२६८ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ७०.७४ लाख असे एकूण १३२८ शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. ७१.३५ लाख दि.१८.२.२०२२ अखेर विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली असून २० शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. ०.४३ लाख वाटप करण्यात आली आहे.

(३) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२१ मध्ये पिक कापणी प्रयोगाच्या आधारे नुकसान भरपाई निश्चित करावयाची व उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रभागा बॅरेज लघु प्रकल्प (ता. दर्यापूर, जि अमरावती) या प्रकल्पास निधी व प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(३३) ३५२७१ (०६-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रभागा बॅरेज लघु प्रकल्प (ता. दर्यापूर, जि अमरावती) हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत तसेच खारपान पट्टयातील सांगवा या गावालगत चंद्रभागा नदी प्रगतीपथावर आहे हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या दिनांक १२ जून, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवला असता प्रथम सुधारीत प्रशासकीय प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्याबाबत (ठराव क्र ७४१४) ठराव करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुधारीत प्रशासकीय मान्यता मा मंत्रीमंडळासमोर सादर करणेसाठी शासनाने दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी मुद्दे उपस्थीत केले असून मुद्यांच्या अनुषंगाने करण्यासाठी अहवाल कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या मार्फत दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रभागा बॅरेज लघु प्रकल्प (ता.दर्यापूर जि. अमरावती) या प्रकल्पाच्या रुपये ३०५.३१ कोटी किमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. जयंत पाटील (०७-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) चंद्रभागा बॅरेज प्रकल्पाचे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव नियामक मंडळाच्या ७४ व्या बैठकीत ठराव क्र. ७४/४ अन्वये मान्य करण्यात आला असून सदर ठरावानुसार प्रकल्पाचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर ठेवण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली आहे.

(३) होय हे खरे आहे, पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

(४) सदर प्रकल्पाचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्यासाठी शासनस्तरावर उपस्थित मुद्दयांची पुर्तता महामंडळाकडून झाल्यानंतर सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला असता नियोजन व वित्त विभागाने मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मुद्दयांबाबतचे अनुपालन सादर करण्याबाबत कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना दि.२४.०१.२०२२ अन्वये कळविण्यात आले आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**एरंडोल (जि.जळगाव) येथील क्रीडा संकुलाच्या कामाबाबत**

**(३४) ३५३१४ (०७-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल)** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एरंडोल (जि.जळगाव) तालुक्यातील क्रीडा संकुलाचे काम कोट्यावधी रुपये खर्च करुनही अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे तसेच झालेल्या कामांची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदरच्या क्रीडा संकुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार (०७-०३-२०२२) :** (१) व (२) सदर क्रीडा संकुलास आजपर्यंत रु.९५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.त्यातून मैदानाचे सपाटीकरण, तारेचे कुंपण, मुख्य गेट व बॅडमिंटन हॉलचे बांधकाम झाले असून, बॅडमिंटन हॉल मधील काही बाबी पूर्ण करावयाच्या आहेत.
(३) क्रीडा संकुल अनुदान मर्यादेत सुधारणा करण्याबाबत निर्णय झाला असून यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारगाव मेमाणे (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे अतिवृष्टीमुळे बंधारे व पुलांचे नुकसान झाल्याबाबत.**

**(३५) ३५३६७ (०७-०१-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारगाव मेमाणे (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरात अतिवृष्टीमुळे बंधारे व पुलांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील बंधारे व पुलांची पहाणी करुन ते दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) पारगाव मेमाणे गावाच्या परिसरातून वाळूंज पारगाव सिंगापूर गुन्होळी महादेव मंदीर ते तालुका हद्द हा इजिमा १२२ दर्जाचा रस्ता जातो.

ऑक्टोबर २०२० मधील अतिवृष्टीमुळे सदर रस्त्याचे व त्यावरील एका मोरीचे नुकसान झालेले आहे. सन २०२१-२२ जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सदर रस्त्यासाठी रु.६० लक्षचे काम मंजूर असून प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोरेगाव पूर्व मुंबई येथील आरे डेअरी पूर्ववत सुरु करून या ठिकाणी तबेलेधारकांकडून शासनास दुध पुरवठा होत नसल्याबाबत

**(३६) ३५३८५ (०७-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (पूर्व) येथील आरे वसाहतीमधील तबेलेधारकांना निवासाकरिता देण्यात आलेल्या जागेत त्यानी मोठे बंगले बांधले असून ते खाजगी चित्रीकरणासाठी प्रतिदिन १ लाख रूपये भाडयाने देवून तबेलेधारक अनधिकृत पैसे कमवुन शासनाच्या कोटयवधी रूपयांचे नुकसान करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सद्य:स्थितीत एकूण किती तबेले अस्तित्वात असून या तबेल्यांमध्ये एकूण किती पशुधन उपलब्ध आहे त्याचा तबेलानिहाय तपशील काय आहे, तबेलेधारकांकडून सद्य:स्थितीत आरेला दरदिवशी किती लिटर दुधाचा पुरवठा करण्यात येतो,
(३) असल्यास, उक्त तबेल्यांमधुन आरे प्रशासनास दुध पुरवठा मुबलक प्रमाणात होत नसल्यामुळे सदरहू तबेले व तबेलेधारकांची निवासस्थाने पुन्हा शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, सदरहू तबेले दाबचारी (जि.पालघर) येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय यापूर्वी शासनाने घेतला असून अद्याप त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे काय,
(५) नसल्यास, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी किती कालावधीत करण्यात येणार आहे?

**श्री. सुनिल केदार (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) आरे वसाहतीत एकूण ३० तबेले असून त्यामध्ये १६१६० एवढे पशुधन आहे. एका तबेल्यात सरासरी ५०० ते ५५० पशुधन आहे. शासन निर्णय दि. ६/१०/१९७७ नुसार पवानाधारकांना खुल्याबाजारात दुध विक्री करण्यास परवानगी देण्यात आली असल्यामुळे परवानेधारक आरे दुग्धशाळेत दुध पुरवठा करीत नाही.

उपरोक्त पार्श्वभुमी विचारात घेऊन परवाना वाटप धोरण सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) आरे दुग्धवसाहतीतील तबेल्यांना या निर्णयातून वगळण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग धुळे यांनी अधिकार व पदाचा गैरवापर केल्याबाबत

**(३७) ३५७१६ (११-०१-२०२२). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे येथे कार्यरत अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता रुजू झाल्यापासून अधिकार व पदाचा गैरवापर करून अवैधरित्या संपत्ती जमा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांनी सा.बां.विभाग धुळे अंतर्गत कामाचे टेंडर मर्जीतील लोकांना देणे, संबंधित ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात देण्यात आलेल्या टेंडर व संबंधित ठेकेदार यांनी केलेल्या कामाची तटस्थ यंत्रणेकडून खातेनिहाय चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (०४-०३-२०२२) :** (१) हे, खरे नाही.
(२) हे खरे नाही.
कंत्राटदाराची निश्चिती ई-निविदा प्रक्रियेव्दारे करण्यात येते. तसेच कामांच्या गुणवत्तेची तपासणी क्षेत्रीय कार्यालयामार्फत व दक्षता व गुण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विठेवाडी-सावकी (ता.देवळा, जि.नाशिक) येथील रस्त्याची झालेली दुरावस्था

**(३८) ३५८०७ (०६-०१-२०२२). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विठेवाडी-सावकी (ता.देवळा, जि.नाशिक) येथील रस्त्याची दुरावस्था झाली असून वाहनधारकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे सप्टेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून संबंधीत विभागाने याची दखल घेऊन तात्काळ रस्ता दुरुस्त करण्याची मागणी वाहनधारकांनी व नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०३-२०२२) :** (१) व (२) हे, खरे आहे.
(३) विठेवाडी-सावकी रस्ता ग्रामीण मार्ग ३६ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी ६.०० कि.मी. इतकी आहे. त्याच्या एकूण लांबीपैकी १.५० कि.मी. लांबीचा पृष्ठभाग हा नादुरुस्त झाला असून रस्ते व पुल दुरुस्तीच्या योजनांमधून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत कामे मंजूरी करीता प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ३५८२९ (१२-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील आदिवासी दुर्गम भागातील रस्ते, नाले, पाण्याची समस्या दूर करण्यासाठी आदिवासी विभागाच्यावतीने ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत कामे मंजूरी करिता प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत कामे मंजूरी करिता प्रलंबित असल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच सदरहू कामांना मंजूरी न दिल्यामुळे आर्थिक वर्षाअखेर कामांना मंजूरी न मिळाल्याने निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत मंजूर करुन कामे त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. के.सी.पाडवी (०७-०३-२०२२) :** (१), (२) व (३) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना जिल्हास्तरावरुन राज्यस्तरावर वर्ग करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने सदर योजनेकरिता आवश्यक सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील प्रस्तावित रिंग रोड बाबत

**(४०) ३५८७४ (११-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातून १७३ किलोमीटर लांबीचा पश्चिम व पूर्व भागातील रिंग रोडच्या चारही टप्प्यांना शासनाने मान्यता दिली असल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०२१ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रिंग रोड साठी ८४३ हेक्टर जमिनीचे संपादन करावे लागणार आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेऊन व निधीची तरतूद करून सदरील प्रकल्प संपादित जमिनीचा शेतकऱ्यांना तातडीने मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

पुणे चक्राकार मार्गाच्या पश्चिम आखणीमध्ये एकूण ३७ गावे बाधीत होत असून अंदाजे एकूण ६८८.३८ हेक्टर खाजगी जमीन संपादित करावी लागणार आहे. पूर्व आखणीमध्ये एकूण ४६ गावे बाधित होणार असून अंदाजे एकूण ८५९.८८ हेक्टर खाजगी जमिन संपादित करावी लागणार आहे.

(३) पुणे चक्राकार मार्गाच्या पश्चिम आखणीमध्ये एकूण ३७ गावांपैकी केळवडे वगळता उर्वरित गावांची भूसंपादनाची अंतिम कलम १८ (१) ची अधिसूचना दिनांक ३१.१२.२०२१ रोजी राजपत्रामध्ये प्रसिंध्द झाली आहे व पुढील मुल्यांकनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. पुणे (पुर्व) चक्राकार मार्गातील एकूण ४६ गावांची भूसंपादनाची अंतिम कलम १८(१) ची अधिसूचनेचा प्रस्ताव फेब्रुवारी, २०२२ अखेरपर्यंत शासनास सादर करण्याचे उद्दिष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे मुंदखेडा - पातोंडा (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथील शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(४१) ३५९७६ (०६-०१-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुंदखेडा - पातोंडा (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथील भुसंपादन प्रस्ताव क्र. एस.आर. क्र.४४/०४ व ५०/०४ शिवारातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झालेल्या असून सन १९९९ ते २००५ या कालावधीत जमिनीचा ताबा कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग यांनी घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष भूसंपादन अधिकारी यांनी भुसंपादानाचा कमी प्रमाणांत मोबदला दिलेला आहे म्हणून सदर शेतकऱ्यांनी मे.दिवाणी न्यायालय, जळगांव याठिकाणी कलम १८ अन्वये भूसंपादन मोबदला वाढवून मिळण्यासाठी अर्ज दाखल केले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर एल.ए.आर मध्ये मे.न्यायालयाने सन २०१७ मध्ये निकाल जवळपास ३ वर्षापुर्वी दिलेला असुन शेतकऱ्यांना मोबदला रक्कम मिळण्याचे प्रस्ताव विशेष भूसंपादन अधिकारी, जळगांव यांचे कार्यालयाकडून मा.कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग, जळगांव व यांचेकडून तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचेकडे गेलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अद्यापपावेतो शेतकऱ्यांना मा.न्यायालच्या आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(६) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (०४-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

भूसंपादन प्रस्ताव क्र. ५०/०४ मध्ये दि. १/३/२००० ते दि. १/४/२००६ या कालावधी मध्ये ताबा घेतलेला आहे व भूसंपादन प्रस्ताव क्र. ४४/०४ मध्ये दि. १/३/२००० ते दि.१५/४/२००७ या कालावधीमध्ये जमीनीचा ताबा घेतलेला आहे.

(२) होय.

(३) होय.

सदर प्रकरणामध्ये दि.४/४/२०१९, दि.२०/४/२०१९ व दि.२५/४/२०१९ रोजी मध्यस्ती तडजोड होऊन मंडळ कार्यालयामार्फत सन माहे एप्रिल-२०१९ ते नोव्हेंबर-२०१९ या कालावधीत निधी मागणी प्रस्ताव प्राप्त झाले आहे.

(४) नाही.

मंडळ कार्यालयाकडून निधी मागणी प्रस्ताव सादर झाल्यानंतर एकुण २२७ भुसंपादनाचे तडजोडीनुसार एकुण देय रक्कम १५०.९८ कोटी पैकी ६५.६३ कोटी इतकी वाढीव मोबदला रक्कम महामंडळामार्फत उपलब्ध निधीनुसार वितरित करण्यात आलेला आहे. उर्वरित रु. ८५.३७ कोटी मात्र इतकी वाढीव मोबदला रक्कम, निधी अभावी वितरित करणे प्रलंबित आहे.

(५) डिसेंबर-२०२१ मध्ये झालेल्या तिसऱ्या हिवाळी अधिवेशनात रु.२५० कोटी निधी भूसंपादन ठोक तरतूद मंजूर करण्यात आलेला असून सदर निधी महामंडळांतर्गत सर्व भूसंपादन न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासन निर्णय / मे.न्यायालयीन आदेशानुसार प्राधान्यक्रमाच्या यादीनुसार वितरीत करण्याचे नियोजन आहे. तसेच भूसंपादन प्रक्र-४४/०४ व ५०/०४ या प्रस्तावातील निधी वाटप देखील प्राधान्यक्रमाच्या यादीत ज्या क्रमांकाने येतील त्यानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात वनस्पती उदयान (बोटॅनिकल गार्डन) विकसित करण्याबाबत..**

**(४२) ३६०२० (११-०१-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावरील विसापूर येथे बंगळूरच्या (कर्नाटक राज्य) धर्तीवर वनस्पती उदयान (बोटॅनिकल गार्डन) विकसित करण्यात येणार असून त्यासाठी महसूल व वनविभागाने ५ कोटी ४४ लाख रुपयांचा निधी प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला असल्याचे दिनांक ३० जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी शासनाने ५ कोटी ४४ लक्ष रुपये उपलब्ध करुन दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वनस्पती उदयान (बोटॅनिकल गार्डन) विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (२१-०१-२०२२) :** (१) व (२) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावरील विसापूर येथे बंगळूरच्या धर्तीवर बोटनिकल गार्डन निर्माण करणे (२४०६-२२९५) या लेखाशिर्षांतर्गत शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१२३/फ-९, दिनांक ३०.०७.२०२१ अन्वये रु.५४४.०० लक्ष रक्कम वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. परंतु सदर रक्कम अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BDS) वर चुकीच्या उपशिर्षात दर्शविल्यामुळे सदर अनुदान मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांना वितरीत करणे शक्य झाले नाही. त्यामुळे मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांचेकडून सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

त्यानुसार त्यांनी दिनांक २२.०९.२०२१ च्या पत्रान्वये (२४०६-२२९५) या राज्य योजनेंतर्गत ५०-इतर खर्च या उपशिर्षात रु.७५०.०० लक्ष रक्कमेचा सुधारीत प्रस्ताव सादर केला.

सदर प्रस्तावामध्ये BDS वर चुकीच्या उपशिर्षात रु.५४४.०० लक्ष वितरीत केल्यामुळे शासन निर्णय दिनांक ३०.०७.२०२१ रद्द करण्यात आला.

वित्त विभाग शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३, दिनांक १४.१०.२०२१ अन्वये मंजूर अर्थसंकल्पीत निधीच्या ६०% अनुदान उपलब्ध होईल असे निर्देश असल्यामुळे सदर योजनेकरिता ६० टक्केच्या मर्यादेत ५०-इतर खर्च या उपशिर्षांतर्गत रु.७५०.०० लक्षपैकी रु.४५०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीत असून शासन निर्णय दिनांक १०.११.२०२१ अन्वये ५० -इतर खर्च या उपशिर्षात रु.४५०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर मार्गावर विसापूर येथील बोटनिकल गार्डनच्या सुरु असलेल्या विविध कामांबाबत मा.प्रधान सचिव (वने) यांनी दिनांक ३०.०७.२०२१ रोजी चंद्रपूर येथे आढावा बैठक घेतली. सदर बैठकीतील सुचनेनुसार प्रस्तुत गार्डन विकसित करण्याबाबतची कामे सुरळीत पार पाडण्यासाठी अनुभवी प्रशिक्षित व्यक्तींची आवश्यकता भासणार असून त्यासाठी संस्था गठीत करुन त्याची नोंदणी करणे आवश्यक आहे असे निर्देश प्राप्त झाल्याने

सदर प्रकरणी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांनी संस्था गठीत करण्याच्या दृष्टीने संस्था नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेले संस्थेचे Bye Laws प्रस्तावित करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्राला जोडणा-या ओणी-पाचल (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) अणुस्कुरा मार्गाची दुरावस्थेबाबत**

**(४३) ३६१८२ (११-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम महाराष्ट्राला जोडणा-या ओणी-पाचल (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) अणुस्कुरा मार्गाची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मार्गाच्या/रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सुमारे ७ कोटी ४४ लाख रुपये खर्चाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या वतीने शासनास सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दुरुस्तीकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठवून तीन महिन्यांचा कालावधी उलटूनही अदयाप प्रस्तावास /अंदाजपत्रास मंजूरी मिळालेली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन स्तरावर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता तयार करण्यात आलेले अंदापत्रक मंजुरी अभावी प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सध्याची रस्त्याची /मार्गाची दुरवस्था पाहता दुरुस्तीकरिता तात्काळ अंदाजपत्रकास मंजूरी देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-०३-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४), (५) हे खरे नाही.
सदर प्रस्ताव विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आला असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ. लाडची (ता. देवळाली, जि. नाशिक) येथील देवस्थान मंदिराची व इतर विकास कामे करण्यास वन विभागाची परवानगी मिळणेबाबत**

**(४४) ३६२९५ (११-०१-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील मौजे लाडची (ता.देवळाली जि. नाशिक) येथील धुळाईमाता मंदीर हे जागृत देवस्थान व श्रध्दास्थान असून या मंदिराचे सुशोभिकरण व इतर विकासकामांसाठी शासनाने निधी मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे देवस्थान हे वन विभाग क्षेत्राअंतर्गत येत असून मंदिराचे सुशोभिकरण व अन्य कामे करण्याबाबत वारंवार मागणी करुनही वन विभागाने अद्याप परवानगी दिली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांची त्यांचे दि. १५ डिसेंबर, २०२० रोजी पत्रान्वये वन विभागाची परवानगी मिळणेबाबत तत्कालीन मा. वने मंत्री यांचेकडे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा. वने मंत्री यांनी वने विभागाची परवानगी देण्यासंदर्भात आदेशित केल्यावर मुख्य वनरक्षक, (वनबल प्रमुख) यांनी त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याचे कळवूनही माहे ऑगस्ट, २०२१ पर्यंत तशी कार्यवाही करण्यांत आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने आदेश देऊनही मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) कार्यालयाकडून अद्याप कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत, तसेच दरम्यानच्या काळात कार्यवाही झाली असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) मौजे लाडची (देवळाली) विधानसभा क्षेत्र ता.जि.नाशिक येथील धुळाईमाता मंदिर हे पश्चिम नाशिक वन विभागात नाशिक वनपरिक्षेत्रातील गंगाम्हाळुंगी वनपरिमंडळातील लाडची या नियतक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात येते. सदर क्षेत्राचा कक्ष क्र.४८० असुन सर्व्हे नं.८२ आहे, त्याचे एकुण क्षेत्र ३१२ हे. आहे. सदरचे वनक्षेत्र हे नमुना नं.१ नुसार राखीव वनक्षेत्र आहे. धुळाई मातेचे मंदिर हे वनक्षेत्रा अंतर्गत स्थापीत आहे. मौजे लाडची येथील धुळाईमाता मंदिराच्या सुशोभिकरण व इतर विकास कामासाठी कोणत्याही यंत्रणेकडून प्रस्ताव प्राप्त झालेला नसुन मंदीराच्या कामाकरीता कोणताही निधी प्राप्त झालेला नाही.

(२) सदरचे क्षेत्र हे वनक्षेत्र असुन त्याच्यात मंदिराच्या शुशोभिकरण व इतर विकास कामांना नाहरकत देण्यापूर्वी प्रस्तावित कामातील व वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे किंवा कसे हे तपासने गरजेचे आहे. याबाबतचा प्रस्ताव उपवनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांचे कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(३) तत्कालीन मा.मंत्री (वने) यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १५.१२.२०२० चे पत्र उपवनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांना दि.२७.०९.२०२१ रोजी पाठविण्यात आलेले आहे.

(४) नाशिक जिल्हयातील मौजे लाडची (देवळाली विधानसभा) क्षेत्र ता.जि.नाशिक येथील धुळाई माता मंदिराच्या कामाकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमीन मागणी प्रस्ताव अद्याप पोवेतो कोणत्याही यंत्रणेने सादर केलेला नाही. तसेच सदरहू कामास निधी मंजुर झाल्याचे किंवा निधी वाटप केल्याचे आदेश प्राप्त झालेले नाही.

(५) नाशिक जिल्हयातील मौजे लाडची (देवळाली) विधानसभा क्षेत्र ता.जि.नाशिक येथील धुळाई माता मंदिराच्या कामाकरीता सन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमीन मागणी प्रस्ताव अद्याप पावेता प्राप्त झालेला नाही. प्रस्तुत विषयी संबंधीत प्रकल्प यंत्रणेकडून वनजमीन मागणी प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

---

**सय्यद पिंप्री (ता.देवळाली जि.नाशिक) येथे**
**तालुका स्तरीय क्रीडा संकुलास निधी मिळण्याबाबत**

**(४५) ३६३१२ (१०-०१-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सय्यद पिंप्री (ता. देवळाली जि.नाशिक) येथील तालुका स्तरीय क्रीडा संकुलाच्या विकासासाठी तसेच क्रीडा संकुलाचे नुतनीकरण करण्यासाठी शासनाने पाच कोटी रुपये दिनांक २९ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास मंजुर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रीडा संकुलाच्या नुतनीकरण तसेच क्रीडा संकुल विकसित करण्याच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०७-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.सय्यद पिंप्री तालुका क्रीडा संकुलासाठी निधी मंजुरीबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरे सराईवाडीतील (ता. मुरबाड जि.ठाणे) ग्रामस्थांना रस्त्याअभावी**
**अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याबाबत**

**(४६) ३६३५१ (०६-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वातंत्र्याची ७३ वर्षे उलटूनही साखरे सराईवाडीतील (ता. मुरबाड जि.ठाणे) ग्रामस्थांना रस्त्याअभावी अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे रस्त्या नसल्याने आजारी व्यक्ती किंवा गर्भवती महिलांना डोलीतून न्यावे लागत असून नवसू धाकू सराई (वय ७०) यांना रुग्णालयात नेत असतांना त्यांचा रस्त्यात मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याअभावी ग्रामस्थांचे हाल होत असल्याने याबाबत शासनाने सखोल चौकशी/ पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास त्यानुसार, शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०७-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सराईवाडी (साखरे) येथे अवकळपाडा पासून ७०० मी लांबीची पायवाट आहे. सदरची पायवाट अवर्गीकृत स्वरुपाची असून खाजगी जमिन धारकांच्या जमिनीतून जाते. सदर ठिकाणी रस्ता करावयाचा झाल्यास खाजगी जमिन धारकांनी दानपत्राद्वारे जिल्हा परिषदेला जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर ठिकाणी रस्त्यासाठी खाजगी जमिनधारकांची संमती मिळविण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडीतील राज्यमार्ग क्र.४० भिवंडी-कल्याण-शिळ मार्गावरील मुदतबाह्य पथकर नाके तातडीने बंद करणेबाबत**

**(४७) ३६४५१ (१७-०१-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील भिवंडी-कल्याण तालुक्यांना जोडणारा राज्यमार्ग क्र.४० वरील गोवे आणि काटई पथकर नाक्याची पथकर वसुलीस परवानगी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील पथकर वसुलीस शेवटची मुदतवाढ महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम अंतर्गत क्र. खाक्षेस.२००४/प्र.क्र.३२५/रस्ते-८ ह्या अधिसूचनेद्वारे कंत्राटदारास दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ९ एप्रिल, २०१९ रोजी पर्यंत दिली होती, हे देखील खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १० एप्रिल, २०१९ ते आज रोजी पर्यंत सुरु असलेल्या पथकर वसुलीस शासनाने कोणत्या परिपत्रक वा अधिसूचनेद्वारा मान्यता दिलेली आहे,
(४) नसल्यास, नियमबाह्य व मुदत संपलेली असतानाही पथकर वसुली करणाऱ्या संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासनाच्या दि. ०९.०४.२०१९, दि. ०६.०७.२०१९, दि.०७.१२.२०१९, दि. ०९.०३.२०२० दि.०७.०९.२०२० च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार दि. ०९.०३.२०२१ पर्यंत पथकर वसुली करण्यात येत होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे लोणवाडी, (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या कामाबाबत**

**(४८) ३६५८२ (०६-०१-२०२२). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे लोणवाडी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम कंत्राटदारास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर तीन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित असतानाही विहित कालमर्यादेत पूर्ण झालेले नसून सदर प्रकल्पाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असल्याने धरणाची मोठया प्रमाणात गळती होत असून शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामाची शासनाने श्री.काटपल्लीवार, अधिक्षक अभियंता यवतमाळ पाटबंधारे मंडळ यांच्यामार्फत उच्चस्तरीय चौकशी केली असून सदर चौकशी अहवालात प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून प्रकल्पामध्ये पाणीसाठा झाला नसल्याचे मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या रुपये १७३ कोटी रक्कमेचा खर्च करुन निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०७-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे,

प्रकल्पाच्या बांधकामाबाबत अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ यांनी चौकशी केली असता काही कामे विहित गुणवत्तेची झाली नसल्याचे आढळले.तथापि, चौकशीवेळी आणि साठा क्षमता निर्मीती झाल्यानंतर सुध्दा आजतागायत प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेला नसून धरणातून गळतीची बाब निदर्शनास आलेली नाही. परंतु धरण भिंतीच्या खालील भागात पाणी जमा होऊन शेतीचे नुकसान झाले बाबत तक्रारी प्राप्त आहेत.

(२) अशंत: खरे आहे,

श्री.काटपल्लीवार, अधीक्षक अभियंता यांचे मार्फत प्रकल्पाचे बांधकामाचे गुणवत्तेबाबत चौकशी झाली आहे. सदर अहवालामध्ये काही कामे विहित गुणवत्तेनुसार झालेली नसल्याचा निष्कर्ष असला तरी त्यामुळे पाणीसाठा झाला नसल्याचे मान्य केले आहे ही बाब खरी नाही.

(३) प्रकल्पावर रु.१२८९.०७ लक्ष खर्च झालेला आहे. सदोष कामांची पुनर्बांधणी आणि प्रकल्पाच्या उर्वरित कामांची प्रगती समाधानकारक नसल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. परंतु कंत्राटदाराला दंड लावल्या पासून कोणत्याही देयकाचे अदायगी झालेली नसल्याने सदर दंड वसुल करता आला नाही. कंत्राटदाराची रु.११.०६ लक्ष सुरक्षा ठेव रक्कम विभागाकडे जमा असुन, सदर सुरक्षा ठेव शासन जमा करण्यात येईल.तसेच दंडात्मक कार्यवाही निविदा किमतीच्या १० टक्के पर्यत मर्यादेत असल्याने, करारनामा निविदेतील दंडात्मक कलम-३ अंतर्गत अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या काळात संबंधित कंत्राटदाराचा मृत्यु झालेला आहे. तसेच संबंधीत अधिका-या विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही पुर्ण झाली असुन, दोषारोप मागे घेण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विक्रमगड (जि. पालघर) येथील आदिवासींच्या मौल्यवान लाकडाचा ऑनलाईन लिलाव करून उप वनरक्षक व सहायक वनरक्षक यांनी फसवणूक केल्याबाबत**

**(४९) ३६५८९ (२५-११-२०२१). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि. पालघर) येथील शासकीय काष्ट विक्री आगारात अनेक आदिवासी खातेदारांच्या मालकी क्षेत्रातील साग खैर या मौल्यवान लाकडासह अन्य प्रजाती मधील हजारो मेट्रिक टन विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या मौल्यवान लाकडाची ऑनलाईन लिलाव प्रक्रिया

जव्हार वन विभागाचे उपवनसंरक्षक व सहाय्यक वनसंरक्षक वाडा यांच्या उपस्थितीत दिनांक १२ जून व १४ जून २०२१ रोजी पार पडली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लिलावात साग व खैर या मोठ्या प्रमाणात वेढी (जाडी) असलेल्या मौल्यवान लाकडांना जळाऊ लाकडांचा दर्जा देऊन ठेकेदाराच्या हितासाठी मातीमोल दराने विक्री करण्यात आली आल्याचा प्रकार दिनांक ३० जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी बांधवांच्या मौल्यवान लाकडाच्या मालाचा दर्जा व प्रत निकृष्ट ठरवून त्याची निर्धारित रक्कम कमी दाखवून ठेकेदारांच्या हितासाठी आदिवासी बांधवांची फसवणूक तसेच जळाऊ लाकूड दाखवून अवघा २.५% वस्तू सेवा कर भरून शासनाची देखील फसवणूक आणि नुकसान करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-१२-२०२१) :** (१) दिनांक १२.०६.२०२१ रोजी काष्ठ विक्री आगार विक्रमगड येथे कोणत्याही प्रकारचा वनोपजाचा Online किंवा जाहीर लिलाव करण्यात आला नाही. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा.नागपूर यांचे पत्र दिनांक ११.०१.२०१८ मधील लिलावाच्या अटी व शर्ती नुसार विक्रमगड येथील शासकीय काष्ठ विक्री आगारात आदिवासी खातेदारांच्या साग, खैर व अन्य प्रजातीची लाकडे ई-ऑक्शन नियोजन वेळापत्रकानुसार दि.१४.०६.२०२१ रोजी ऑनलाईन लिलाव वनविभागाच्या ई-ऑक्शन पोर्टलवर करण्यात आली आहे. ही संपूर्ण प्रक्रिया Computer System Generated असल्याने व त्यात मानवी हस्तक्षेप करण्यात आला नाही.
(२) व (३) हे खरे नाही, आदिवासी खातेदारांच्या शेतजमीनीतून उत्पादीत झालेल्या माल विक्रीसाठी प्राप्त आहे. सदर मालाची लांबी, गोलाई तपासुन तो वाकडा, पोकळ, गाठाळ आहे का ते पाहुन आणि मालातुन प्राप्त होणाऱ्या चिराण योग्य मालाची उपलब्धता तपासणी करुन त्याची वर्गवारी केली आहे. सदर मालाची तपासणी डेपो ऑफीसर तथा वनक्षेत्रपाल (प्रा.) विक्रमगड यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाचे वनोपजाच्या वर्गिकरणाबाबतच्या दि.३०.१०.१९८६ चे परिपत्रकानुसार केली आहे. सदर मालाची दि. १४ जून, २०२१ रोजी ऑनलाईन लिलाव झाल्याने लिलावात ठेवण्यात आलेल्या लाकडांना निर्धारीत किंमतीपेक्षा अधीकची स्पर्धात्मक बोली प्राप्त झाली आहे. सदर लिलावाची किंमत संबंधीत आदिवासी खातेदारांना मान्य आहे.

दि.१४.०६.२०२१ रोजी ई-ऑक्शन पोर्टलवर विक्री केलेल्या साग व खैर या प्रजातीच्या इमारती व जळावू किटा मालाच्या विक्री रक्कमेवर शासन नियमाप्रमाणे १८% वस्तु व सेवा कर व २.५% आयकर वसुल करण्याची कार्यवाही ऑनलाईन प्रक्रिया असल्यामुळे लिलाव बोली ठेकेदार यांनी सदर विक्रीची पूर्ण रक्कम भरणा करतांना वस्तु व सेवाकर व आयकर वसुल करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे वरवडे (ता.कणकवली, जि. सिंधुदुर्ग) येथील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत करण्याबाबत

**(५०) ३७६०० (१०-०१-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरवडे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ते परबवाडी गवळदेव पर्यंतचा १ किलोमीटर लांबीचा रस्ता सन २००२ मध्ये ग्रामस्थांचे श्रमदान व रोजगार हमी योजनेअंतर्गत तत्कालीन मा.खासदार निधीतून सदर रस्त्यांचे काम पूर्ण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची आत्तापर्यंत एकदाही दुरुस्ती, खडीकरण, डांबरीकरण, रस्त्यात येणाऱ्या मोऱ्या व साईडपट्टयाचे काम न केल्यामुळे तसेच सदर रस्ता शेतकऱ्यांचे शेतातून जात असल्यामुळे दरवर्षी शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ मध्ये पुरहानी कार्यक्रमांतर्गत २१० मीटर रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम झाले असून रस्त्याची लांबी १ कि.मी असल्याची व रस्त्याच्या उर्वरीत लांबीमधील पृष्ठभाग नादुरुस्त असल्याने डांबरीकरण करणे, रस्त्यात येणाऱ्या मोऱ्या व साईडपट्टयांचे काम तसेच संरक्षक भिंत बांधणे आवश्यक असल्याचे तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार रस्त्याचे काम करणे प्रस्तावीत आहे, तथापि सदर रस्त्याच्या नादुरुस्त झालेल्या पृष्ठभागाचे डांबरीकरण व संरक्षक भिंत बांधण्याबाबत शासनाने अद्यापही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामास अद्याप सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर रस्त्याच्या कामास किती निधी लागणार आहे, तसेच जिल्हा परिषद निधीची अडचण लक्षात घेता सदर रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून करण्याबाबत ग्रामस्थांनी व सेवाभावी संस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सिंधुदूर्ग गट विकास अधिकारी पं.स कणकवली तसेच मा. ग्रामविकास मंत्री व मा. पालकमंत्री, सिंधुदूर्ग जिल्हा यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती उक्त रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ मध्ये पूरहानी कार्यक्रमांतर्गत २१० मीटरचे डांबरीकरणाचे काम झालेले असून सदर लांबी सुस्थितीत आहे. तसेच सदर रस्त्याच्या एकुण १.०० कि.मी. लांबीपैकी शेतीमधून जाणाऱ्या रस्त्याच्या भागाची लांबी ४८० मी. असून सदर लांबीमध्ये भरावाच्या भागामध्ये पावसाळ्यात रस्त्याच्या भरावाची माती कोसळून नुकसान होते, ही बाब खरी आहे.

(३) सदर रस्त्याची दुरूस्ती, संरक्षक भिंत तसेच नुतनीकरण दुरूस्ती करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना प्रारूप आराखडा सन २०२२-२३ जिल्हा परिषदेच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ च्या पत्रान्वये, जिल्हा नियोजन विभागाकडे सादर करण्यात आला असून सदर आराखड्यास मंजुरी मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्या-टप्प्याने काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) सदर रस्ता सुस्थितीत करावयाचा झाल्यास अंदाजे रू.४६.५० लक्ष इतका निधी अपेक्षित आहे. सदर रस्त्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे.
(५) व (६) मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्यास दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली असून सदर शासन निर्णयातील निकषाप्रमाणे प्राप्त निवेदनाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.